# लक्ष्य असावे तर असे

जीवनाचे काही लक्ष्य नसेल तर जीवन दिशाहीन होत जाते. तशाच प्रकारे जसे यात्रेकरु रस्त्याने तर चालला आहे, परंतु त्यास कोठे जायचे याचा पत्ता माहित नाही. भौतिक आणि सांसरिक रुपाने तर प्रायः लोक चिकित्सक, वैज्ञानिक, राजनेता, व्यवसायक, खेळाडू इ. बनण्याचे लक्ष्य ठेवतात. आणि ते लक्ष्य प्राप्त करण्यासाठी ते यथाशक्ती मेहनत सुध्दा करतात. परंतु काय आपण कधी या विनाशी लक्ष्यांपासुन हटून कधी अविनाशी लक्ष्याची कल्पना तरी केली का ? आणि काय मानव जीवन केवळ विनाशी प्राप्तिसाठीच मिळाले आहे ? निःसंदेह नाही. म्हणून हा विषय आत्म मंथनाचा आहे. ज्यावर प्रत्येक जीवन यात्रीला अवश्य चिंतन करायला हवे.

सांसारिक प्राप्ति जीवननिर्वाहासाठी व्यक्ती राजकारण, व्यापार, चिकित्सा, ज्या ही क्षेत्रात यश मिळवितो. अथवा जे लक्ष्य निर्धारित करतो त्यातुन केवळ तात्पूरत्या आणि विनाशी प्राप्तिच होते, जी त्याच्या वर्तमान जन्मापुरती किंवा या जन्माच्या काही वर्षांपर्यंतच कायम राहते. आणि या लक्ष्याच्या साधनेत त्याला अपेक्षेपेक्षा अधिक संघर्ष करावा लागतो. सुखाच्या बदल्यात, दुःख आणि तणाव अधिक झेलावा लागतो. अर्थात भौतिक लक्ष्य मनुष्याच्या सम्पूर्ण जीवनाची निश्चिंतता आणि सुख-शांतिची सुनिश्चिती करु शकत नाही.

अविनाशी प्राप्ति- साधारण मनुष्यांच्या जीवनाची तुला जर आपल पुर्वज देवी-देवतांच्या श्रेष्ठ जीवनाशी केली, तर आपल्याला ही गोष्ट स्पष्ट होईल कि त्यांचे जीवन सम्पूर्ण सुख, शांती, समृध्दि आणि सदाकाळच्या प्राप्तिंनी युक्त होती. दैवी स्वराज्यात कधी भिती, शोक, रोग, हिंसाचार, भ्रष्टाचार या सारख्या समस्या नव्हत्या. कशाचाही अभाव नव्हता. आपण या पूर्वज देवी.देवतांना आदर्श मानून त्यांची पूजा-अर्चना तर अवश्य करतो, परंतु काय कधी या गोष्टीवर आपण विचार केला कि त्यांनी या अविनाशी सुख-समृध्दि सम्पन्न दैवी पदाची प्राप्ति कशा प्रकारे केली ? आणि कदाचित आपण सुध्दा असे श्रेष्ठ जीवन बनवू शकत नाही ?

पवित्रताच सुख, शांती, व समृध्दिचा स्त्रोत जर विवेक संगत चिंतन केले गेले, तर दैवी सभ्यता आणि संस्कृतिच्या स्थायित्व आणि त्याच्या अमरतेचे, तेथील अपार सुख समृध्दिचे, अविनाशी प्राप्तिचा मुळ आधार त्या काळात राहणाऱ्या आत्म्यांची सम्पूर्ण पवित्रता, दिव्यता आणि सच्चरित्रताच होती. जी शनैः-शनैः काळाच्या ओघात क्षीण होत गेली. मानव मनाचे विचार विकारगस्त आणि दूषित होत गेले. फळस्वरुप सम्पूर्ण सुखाची परिणीत कलियुगाच्या अंतापर्यंत सर्वत्र दुःख, अशांती, तनाव आणि भयाच्या रुपात झाली. पुज्य देवता, पतित आणि पुजारी बनले. आणि म्हणून ते देवी-देवतांच्या बदल्यात मानव म्हटले जाऊ लागले.

हे युग देवत्वाच्या प्राप्तिचे आहे - पुन्हा आपल्याला हे जाणून अंत्यंत आश्चर्य आणि प्रसन्नता होईल कि मानवाला देव बनविणारे, नर्काला स्वर्ग बनविणारे, विश्वकल्याणकर्ता पतित-पावन गीताज्ञान दाता, परमपिता परमात्मा शिव धरतीवर गुप्त मानव तनात (प्रजापिता ब्रह्मा) अवतरित होऊन हे रहस्य उद्घाटित करीत आहेत कि हे आत्म्यांनो ! हे युग कल्याणकारी पुरुषोत्तम संगम युग अर्थात`देवत्व प्राप्तिचे युग आहे. या युगात विकारांचा त्याग आणि मन, वचन कर्माची पवित्रता धारण करुन, कोणीही मानव देवतुल्य पदाची प्राप्ति करु शकतो. आणि वास्तविक ही धरती प्रथम देव भूमिच होती. आणि आपण सर्व देवी देवता होतो. आज आपण स्वतःला विसरलो आहोत. म्हणूनच अल्पकाळाची धन-संपत्ती आणि विनाशी सुखाच्या मागे आपल्या जीवनाचे हीरेतुल्य क्षण कवडीच्या भावात गमावित आहोत. परंतु या सृष्टिच्या परिवर्तन काळात पुन्हा परमात्मा आम्हाला संस्कार परिवर्तनाव्दारे मानवापासून देव बनण्याचे

वचन देत आहेत. म्हणून आम्हाला सृष्टिच्या अंतिम क्षणी वरील श्रेष्ठ लक्ष्य प्राप्तिसाठी जुटायला हवे.

सर्वश्रेष्ठ लक्ष्य - भलेही एखाद्या देशाचा राष्ट्रपति का असेना, तो सुध्दा देवतांसमान, सम्पूर्ण पवित्र सम्पुर्ण सुखी आणि पूज्यनीय नसतो. अल्पकाळात त्याच्या पद आणि प्राप्तिचे पतन होऊ शकते. परंतु देवत्वाचे पद किंवा लक्ष्मी आणि नारायण समान बनण्याचे लक्ष्य, या सम्पूर्ण ब्रह्माण्डात जीवनाचे सर्वश्रेष्ठ लक्ष्य आहे. जे प्राप्त करण्यासाठी मानव अनेक जन्म भक्ती करतो. तत्पश्र्चात ईश्वरीय कृपेने त्याला आध्यात्मिक ज्ञान आणि राजयोगाची प्राप्ति होते. ज्ञानाची दिव्य दृष्टि मिळते ज्या व्दारेच तो आपले हे महान लक्ष्य निर्धारित करतो. पुन्हा परमात्मा मानव मात्रासाठी हे लक्ष्य देत आहेत. परंतु लक्ष्य प्राप्त करण्यासाठी त्या मनुरुप महान लक्षणांना सुध्दा अवलंबिणे जरुरी आहे. जे प्रत्येक व्यक्तीच्या निजी पुरुषार्थावर निर्भर आहे. म्हणून जर आम्हाला ईश्वरात आस्था आणि निश्चय आहे, आणि जीवनात महान बनण्याचा संकल्प आहे, तर विनाशी पद आणि अल्पकाळाच्या प्राप्तिंच्या मागे जीवन गमावण्याच्या बदल्यात का नव्हे आपण या सर्वोच्च लक्ष्याच्या प्राप्तिसाठी दृढ संकल्पित होऊन पुरुषार्थाला लागावे. आणि या अंतिम जन्मात विकारांचा त्याग करुन पवित्रतेची प्रतिज्ञा करावी.

**- ब्रह्माकुमारीज् वार्ता फिचर्स**

**www.bkvarta.com**